बातम्या, लेख व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १५९ वा | सोमवार दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)
dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### बसस्थानकात एक लाखाची पिशवी चोरली

तुळजापूर(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मल्लीनाथ बाबुराव कोनाळे, वय ७५ वर्षे, रा.किलज ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२८.०८.२०२५ रोजी एसबीआय बॅक शाखा नळदुर्ग रोड तुळजापूर येथुन रोख रक्कम १,००,०००काढुन किलज येथे जाण्यासाठी तुळजापूर बसस्थानक येथे आले असता अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून मल्लीनाथ कोनाळे यांची कापडी पिशवी कापून पैसे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे -मल्लीनाथ कोनाळे यांनी दि.२९.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### भुम येथून मोटारसायकलची चोरी

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे फिर्यादी नामे-दशरथ शिवाजी साठे, वय ५१ वर्षे, रा.लक्ष्मीनगर गुरुदेव शाळेजवळ भुम ता. भुम जि. धाराशिव यांची अंदाजे ५०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि. २८.०८.२०२५ रोजी आठवडी बाजार पानसुपारी विकण्याची गल्ली भुम येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दशरथ साठे यांनी दि.२९.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत रमेश वय ४३ वर्षे, रा. खेड ता. जि. धाराशिव हे दि.२९.०८.२०२५ रोजी सु खेड पानटपरी जवळ अंदाजे १,२०० किंमतीची १२ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत दत्ता रा. गंजेवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२९.०८.२०२५ रोजी २०.५८ वा. सु गंजेवाडी येथे अंदाजे २,३९० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ५९ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये तमालवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२९ ऑगस्ट रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २९६ कारवाया करुन १,९३,९०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## जिल्ह्यात पीक कापणी प्रयोग सुरू, शेतकऱ्यांनी प्रक्रियेवर लक्ष द्यावे : आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात पीक विम्याच्या अनुषंगाने मूग व उडीद पिकांचे पीक कापणी प्रयोग सुरू करण्यात आले आहेत. या माध्यमातून निष्पन्न झालेल्या उत्पादना आधारे विमा नुकसान भरपाई निश्चित केली जाते, त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी त्याकडे सतर्कतेने लक्ष द्यावे, असे आवाहन मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे. सध्या धाराशिव जिल्ह्यात मूग व उडीद पिकांचे पीक कापणी प्रयोग सुरु झाले आहेत. जिल्ह्यात ३५३१६ शेतकरी अर्जाद्वारे १४९९८ हे क्षेत्राचा उडीद पिकाचा व ९२०८ शेतकरी अर्जाद्वारे २५६० हे क्षेत्राचा मूग पिकाचा विमा हप्ता भरला आहे. त्यामुळे मूग व उडीद उत्पादक शेतकरी बांधवांनी अधिक जागरूकपणे या सगळ्या बाबींकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे. ऑगस्ट महिन्यात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. ऑगस्ट महिन्याच्या सरासरीच्या तुलनेत १६० टक्क्यांहुन अधिक पावसाची नोंद झाली आहे. परिणामी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्या अनुषंगाने राज्याचे कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्याकडे सरसकट पंचनामे करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पीक कापणी प्रयोगाच्या माध्यमातून उत्पादन निश्चित करून त्याप्रमाणे विमा नुकसान भरपाईची रक्कम निश्चित केली जाते. त्यामुळे या प्रक्रियेवर सर्वांनीच अधिक सतर्क होऊन लक्ष देणे गरजेचे आहे. जिल्ह्यात मूग व उडीद पिकांचे पीक कापणी प्रयोग हे मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, शेतकरी प्रतिनिधी, विमा कंपनी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत केले जात आहेत. या प्रयोगाद्वारेच निष्पन्न उत्पन्नाच्या आधारे पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने पीक कापणी प्रयोग अत्यंत महत्वपूर्ण असून शेतकरी प्रतिनिधी यांनी या प्रक्रियेवर लक्ष द्यावे, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

## मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला सकल मराठा भगिनींचा पाठिंबा




धाराशिव (प्रतिनिधी) : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे सुरू असलेल्या आंदोलनाला सकल मराठा भगिनींनी पाठिंबा जाहीर केला आहे. याबाबतचे निवेदन शनिवारी दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे देण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून मराठा समाज आरक्षणासाठी संघर्ष करत असून, समाजामध्ये तीव्र भावना निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद केले आहे. जरांगे पाटील यांनी सुरू केलेले आंदोलन हे शांततेत आणि लोकशाही मार्गाने सुरू असल्यामुळे शासनाने तातडीने यावर सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर सौ. अलका हनुमंत गोरखर, सौ. किरण परशुराम निंबाळकर, माया सखाराम चव्हाण, सौ. पूजा पाटील, सौ. अलका प्रकाश मगर, देवकन्या गाडे, सौ. शशिकला सुरेश पाटील कांचन किरण भंडारे, शारदा वसंत कोल्हाल, चिमणा ताई भीमराव जाधव, श्रीमती शालिनी सुभाषराव सुरवसे, शारदा वसंत कोल्हाल, चिमणा ताई जाधव,आदींसह एकूण अकरा महिला भगिनींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सकल मराठा भगिनींच्या या पावलामुळे मराठा समाजाच्या आंदोलनाला आणखी बळ मिळाले असून, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी जोर धरत आहे.

## विश्वातील ५२ देशांत धम्म प्रशिक्षणाचे कार्य सुरू: भन्ते संघरक्षीत यांच्या जन्म शताब्दी महोत्सवानिमित्त कार्यक्रमात ज्ञानपालीत यांचे प्रतिपादन



उमरगा(प्रतिनिधी)- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वानानंतर उर्गेन संघरक्षीतांनी बौद्ध धम्माच्या चळवळीसाठी महान असे काम केलेले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीकोणा-तील जागतिक बौद्ध संघाची स्थापना केली आहे बौद्ध धम्माचे कार्य हे गतीने होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण केल्याचे प्रतिपादन धम्मचारी ज्ञानपालीत यांनी व्यक्त केले.

शहरातील बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृहात बुधवारी (२७) भन्ते संघरक्षीतांच्या जन्म शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ज्ञानपालीत बोलत होते. धाराशिव येथील त्रिरत्न बुद्धिस्ट सेंटरचे चेअरमन धम्मचारी रत्नपालित अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमाला धम्मचारी प्रज्ञाजित, धम्मचारी विबोध, धम्मचारी जिंनघोष, भारतीय बौद्ध महासभा अध्यक्ष आनंद कांबळे, धम्मचारी धम्मभूषण, सुमित कोथिंबीरे आदी उपस्थित होते. प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, उर्गेन संघरक्षित अन तथागत भगवान बुद्धाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रथम संस्थेच्या वतीने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ऑक्सिजन किट भेट देण्यात आले तर चाइल्ड ड्रीम संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

धम्मचारी धम्मभूषण यांनी सूत्रसंचालन केले. धम्मचारी रत्नपालित यांनी आभार मानले. यासाठी अजय गायकवाड, अभिजीत कांबळे, हरिदास कांबळे, प्राचार्य महादेव भोसले, तानाजी कांबळे, उत्तमराव गायकवाड, प्रीतीताई मनोहर, मिलिंद कांबळे, संतोष दलाल आदींनी परिश्रम घेतले. मिशनरी पद्धतीने धम्माचे हे कार्य केले पाहिजे सन १९५० साली महाबोधी सोसायटी पाक्षिकात लिहलेले भगवान बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य या लेखात डॉ बाबासाहेब म्हणतात नवा धम्म सेवक निर्माण केला पाहिजे, मिशनरी पद्धतीने धम्माचे हे कार्य केले पाहिजे,जागतिक संघ निर्माण केला पाहिजे म्हणून त्यानीं देश विदेशात धम्माचे प्रशिक्षण केंद्र स्थापन करून नवदीक्षितांना धम्म शिकवण्यासाठी धम्म प्रशिक्षणाचे त्रिरत्नबौद्ध महासंघाचे कार्य अविरतपणे सुरू आहे. जगभरात ५२ देशांमध्ये धम्म प्रशिक्षणाचे कार्य नियोजनबद्ध पध्दतीने सुरु आहे, असे धम्मचारी ज्ञानपालित यांनी सांगितले.

## मिठाई दुकाने सजली, भेसळयुक्त पदार्थांची विक्री केल्यास कारवाई

परंडा (प्रतिनिधी)- परंडा सध्या गणेश उत्सव व गौरीपूजन सणाची जय्यत तयारी सुरु असून बुधवारी (दि.२७) गणरायाची प्रतिष्ठापना होणार आहे, त्याच प्रमाणे गौरपूजनही साजरे केले जाणार आहे. या काळात मिठाई व इतर गोडधोड अन्नपदार्थास नागरिकांची मोठी मागणी असते. वाढत्या मागणीचा गैरफायदा घेऊन बाजारात बनावट व भेसळयुक्त पदार्थ विक्री केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः अनेक विक्रेते हे निकृष्ट व शिळ्या पदार्थांची विक्री करतात याचा नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतो. यासाठी नागरिकांनी बेस्ट बीफोरचा बोर्ड पाहूनच मिठाई व अन्नपदार्थांची खरेदी करावी तर व्यावसायिकांनी पदार्थांवर बेस्ट बिफोर लिहावे अन्यथा त्यांच्यावर कारवाई होऊ शकते. हिंदू धर्मियांमध्ये गणेशोत्सव व गौरी पूजन सणास अनन्यसाधारण महत्व आहे. गणरायाची प्रतिष्ठापणा करुन १० दिवस तर गौरींची तीन दिवस पूजाअर्चा करुन मोठ्या भक्तीभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात हे दोन्ही सण साजरे केले जातात.

या निमित्ताने नागरिक वस्तूंच्या खरेदीबरोबरच मिठाई व गोड पदार्थ खरेदी करतात. हे दोन्ही सण सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. याच काळात व्यावसायिक कमाईच्या ग्राहकांनी मिठाई घेताना याकडे लक्ष द्यावे... हॉटेल, बेकरी, स्वीटमार्टमधील ट्रेमध्ये ठेवण्यात आलेल्या खाद्यपदार्थांची विक्री करताना बेस्ट बिफोर लिहिणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी ग्राहकांनी पदार्थ खरेदी करताना बेस्ट बिफोर लिहिलेले असेल तरच खरेदी करावी. त्याच प्रमाणे विक्रेत्यांनी देखील पदार्थांवर बेस्टबिफोर असेच लिहावे. बनावट खव्याची निर्मिती केली जाते बनावट खवा तयार करण्यासाठी साधारणतः भेसळयुक्त दूध किंवा दुधाची पावडर वापरली जाते. त्यामध्ये मैदा, स्टार्च, डालडा, साखर मिसळली जाते. काहीवेळा रंग आणि स्वाद मिसळले जातात. अनेक ठिकाणी पदार्थ तयार करताना स्वच्छता ठेवली जात नाही. परवाना निलंबनाची कारवाई करण्यात येईल भेसळयुक्त अन्न पदार्थ विक्री केल्या जात असल्याचे निदर्शनास आले असता अन्न व औषध प्रशासनामार्फत कारवाई केली जाते. अन्न पदार्थांचे नमुने घेऊन ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले जातात. तपासणीअंती संबंधीत दुकानाचा विक्री परवाना निलंबित केला जाऊ शकतो. मुदतबाह्य पदार्थांची विक्री केल्यास दंडही आकारला जाऊ शकतो. हव्यासापोटी भेसळयुक्त पदार्थ ग्राहकांना विक्री करतात.

बहुतांश वेळा व्यावसायिक हे जुनी मिठाई व पदार्थ नवीन पॅकिंग व मुदतवाढ करून विक्री करतात. याकडे ग्राहक दुर्लक्ष करतात यामुळे असे पदार्थ खाल्ल्याने आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. यासाठी नागरिकांनी सणासुदीच्या काळात अन्नपदार्थ चौकशी करूनच खरेदी करणे आवश्यक आहे. सणासुदीच्या काळात ग्राहकांची व्यावसायिकांकडून फसवणूक होऊ नये यासाठी अन्न व औषध प्रशासनाने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. दरम्यान अन्न व औषध प्रशासनाने परंडा शहरातील हॉटेल, रेस्टॉरन्ट व स्वीटमार्ट, हातगाडेवाले आदींची तपासणीसाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न



मुरूम (सुधीर पंचगल्ले)- येथील श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची आयोजित १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्रीराम मंगल कार्यालयात शनिवारी (ता. ३०) रोजी उत्साहाच्या वातावरणात पार पडली. या पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ३१ मार्च २०२५ च्या ताळेबंद, नफातोटा व विविध विषयावर सविस्तर चर्चा करताना यंदाच्या आर्थिक वर्षात या पतसंस्थेस २९ लाख ९३ हजार ८२८ रुपयाचा निव्वळ नफा झाला असून या पतसंस्थेकडे यंदा १३ कोटी ४० लाख ७२ हजार ९४९ रुपयाच्या ठेवी, संस्थेने यंदाच्या आर्थिक वर्षात १ कोटी ५३ लाख १६ हजार ४४५ रुपयाचे कर्ज वाटप केले आहे. संस्थेची गुंतवणूक ४ कोटी ८५ लाख १३ हजार १२७ रुपये असून या संस्थेचे ३७२० सभासद आहेत. संस्थेच्या स्थापनेपासूनच ऑडीट वर्ग 'अ ' दर्जा प्राप्त असून संपूर्ण संगणकीकृत, मानाचा विभागीय दीपस्तंभ पुरस्कार प्राप्त झाला असल्याचे अध्यक्षीय समारोप प्रसंगी त्यांनी सांगितले. यावेळी शिवसेना नेते भीमराव वरनाळे, चंद्रशेखर मुदकण्णा, शिवसेना तालुका प्रमुख बळीमामा सुरवसे, जगन्नाथ पाटील, व्यंकटराव पाटील, तानाजी फुकटे, चेतन पाटील, सायबणप्पा हिरमुखे, प्राचार्य दत्तात्रय इंगळे, चेतन पाटील, किसन खंडागळे, देवानंद बिराजदार, प्रशांत मुदकण्णा, भागवत सोनवणे, शंकर पाटील, भगत माळी, खय्युम चाकूरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सभेतील विषय पत्रिकेचे वाचन शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे यांनी करून बहुमताने सर्व ठरावास एकमताने सहमती घेतली. किसन खंडागळे यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले.

पतसंस्थेचे उपाध्यक्ष शरणप्पा मुदकण्णा, सचिव कमलाकर जाधव, संचालक संगीता अशोक जाधव, वंदना सोनवणे, मनिष मुदकण्णा, श्रीशैल बिराजदार, बाबासाहेब पाटील, इंद्रजित लोखंडे, कॅशिअर चिदानंद स्वामी, राजेंद्र मुदकण्णा, प्रशांत काशेट्टे, सचिन कंटेकूरे, नेहा रावळकर, संतोष मुदकण्णा, महातंय्या स्वामी, गुंडेराव गुरव आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य दत्तात्रय इंगळे यांनी केले. सभेचे सूत्रसंचालन संचालक मनोज बोंदर तर आभार अमृत वरनाळे यांनी मानले. यावेळी पंचक्रोशीतून बहुसंख्येने सभासद, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## रमशा पल्ला व जोया शेख यांच्यासह पाल्यांचा सत्कार



धाराशिव(प्रतिनिधी)-शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील नेत्र विभागातील नेत्र तज्ञ डॉ.पल्ला यांची मुलगी रमशा मुस्तफा पल्ला व जोया रफिक शेख यांनी नीट परीक्षे मध्ये यश संपादन करून रमशा हिचा लातुर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जोया हिचा अंबाजोगाई शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार जीएमसी सुरक्षा समितीच्या वतीने करण्यात आला,अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहाण व जीएमसी सुरक्षा समिती अध्यक्ष वैद्यकशास्त्र प्रा.डॉ.विश्वजीत पवार, वैद्यकीय अधिक्षक तथा जीमसी सुरक्षा समिती सचिव सदस्य डॉ.तानाजी लाकाळ,यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ व पेढे भरवुन शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी जीएमसी सुरक्षा समिती सदस्य अब्दुल लतीफ,गणेश वाघमारे,आरोग्यमित्र शेख रौफ,सहा.पोलीस निरीक्षक श्री हावळे, बाळासाहेब मुरकुटे,श्री जावळे,व डॉ.मुस्तफा पल्ला,पालकांसह जीएमसी सुरक्षा समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# झेडपीच्या ४ खोल्यांमध्ये पालिकेची शाळा: पहिली, दुसरीचे वर्ग कन्या प्रशालेतच भरणार!



कळंब(प्रतिनिधी)-नगर पालिका शाळा क्रमांक एकची इमारत धोकादायक ठरल्याने अखेर न. प. शाळा भरवण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चार खोल्या वर्ग देण्यात आल्या आहे. त्यामुळे नगर पालिकेचा तात्पुरती व्यवस्था झाली आहे.

नगर पालिकेच्या मालकीची ही शाळेची इमारत सन १९८८ मध्ये बांधण्यात आली होती. या शाळेतील शिक्षकांनी शिक्षणाच्या दर्जावर भर देत गळती कमी करून विद्यार्थी संख्या टिकवून ठेवली आहे. विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना बसवणे, मुलांकडे विशेष लक्ष देणे आदी बाबींवर भर देऊन पटसंख्या टिकवण्यासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत.


इमारत जुनी व धोकादायक असल्यामुळे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले. अहवालानुसार सदर इमारत धोकादायक असल्याने आणि सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे नगर परिषद प्राथमिक शाळेचे वर्ग जि.प. कन्या प्रशालेतील चार खोल्यांमध्ये भरवले जात आहेत. त्यामुळे येथे अडचण निर्माण होत असल्यामुळे कन्या शाळेतील विद्यार्थिनींच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानुसार गटशिक्षणाधिकारी यांनी नगर परिषद मुख्याधिकारी यांना अन्यत्र वर्गांची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता नगर पालिकेची शाळा कोठे भरवायची असा प्रश्न उपस्थित होत होता, तद्नंतर मुख्याधिकारी मंजुषा गुरमे यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र पाठवले आहे.

कन्या प्रशालेत एकूण चार वर्ग खोल्या उपलब्ध करून दिल्या असून त्या चार खोल्यांमध्ये सात वर्गांचे अध्यापन सुरू आहे. नगर पालिका शाळा क्रमांक एकची नवीन इमारत तयार होईपर्यंत कन्या शाळेत वर्ग खोल्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी विनंती केली होती.

शाळेत भरणार तिसरी ते सातवीचे वर्ग कन्या शाळेलगत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिली ते चौथीपर्यंतची शाळा चालते. येथील चार वर्ग खोल्या नगर पालिका शाळा क्रमांक एकसाठी तात्पुरत्या देण्यात आल्या आहेत. येथे तिसरी ते सातवीचे वर्ग भरवले जाणार आहेत. पहिली व दुसरीचे वर्ग कन्या शाळेत भरवले जाणार आहेत. तसेच जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळेतील सर्व वर्ग कन्या शाळेत भरवले जाणार आहेत.

यामध्ये गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांनी समन्वयाने हा प्रश्न मिटवला आहे.

# प्राचीन बारवेची डागडूजी करून श्री गणेशाची प्रतिष्ठापना




तुळजापूर(प्रतिनिधी)-नागरिकांना निरंतर पाण्याची उपलब्धता करून देणाऱ्या प्राचिन बारवांची विविध ठिकाणी पडझड सुरू असून आता त्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. मात्र, तुळजापूरात अशाच एका दूरवस्थेत असलेल्या प्राचिन बारवेचे जतन करून त्यातच श्री गणेशाची प्रतिष्ठापणा करण्याचा उपक्रम जयभारत तरुण गणेश मंडळाव्या वतीने राबवण्यात आला आहे.

तुळजापूर शहरात अनेक बारवांची आता दुरवस्था झाली आहे. यामध्ये झाडे झुडपे मोठ्याप्रमाणात वाढलेली आहेत. मात्र, शहरातील साळुंके गल्लीतील जय भारत तरूण मंडळाने प्राचीन बारवेचे संवर्धन करून एक आदर्श निर्माण केला आहे. विशेष म्हणजे शहरातील अनेक प्राचीन विहिरी व कुंड लोप पावत मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शहरातील शहरातील साळुंके गल्लीतील जय भारत तरूण मंडळाने नियोजनपूर्वक बारवेतच श्री गणेशाची स्थापना केली आहे.

अभिजीत साळुंके आणि वैभव वडगावकर यांच्या मार्गदर्शना खाली मंडळाचे अध्यक्ष दुर्गेश साळुंके, उपाध्यक्ष अनिल निकम, महेश भालेकर, रियाज शेख, रूद्र साळुंके आदि मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मिरवणूकीवरील वायपट खर्च टाळत मंडळाने गेल्या ५ वर्षांपासून प्राचिन बारची स्वच्छता राखली आहे. बारवेची रंगरंगोटी करण्यात आली आहे. मंडळाच्या वतीने येथे गणेश मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येत असल्याने विहिरीचे पावित्र्य राखण्यात येत आहे. गणेशोत्सवात मंडळाचा वतीने रक्तदान, वृक्षारोपण आदि सामाजिक उपक्रम राबवण्यात येत असून मंडळाचा वतीने वर्गणी मुक्त गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. जय भारत तरूण मंडळाचा या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

दुष्काळात या प्राचीन विहिरींनी तहान भागवली तीर्थ क्षेत्र तुळजापूरात भगवती, कोटाची, अहिल्यादेवी होळकर, गांडेची विहिर, चंद्रकुंड, सूर्यकुंड आदि १२ ते १३ प्राचीन विहिरी व कुंड आहेत.

विशेष म्हणजे १९७२ च्या दुष्काळात या प्राचीन विहिरींनी नागरीकांची तहान भागवली होती. मात्र प्रशासनाचा दुर्लक्ष व नागरीकांचा उदासीनता व अतिक्रमणामुळे शहरातील अनेक प्राचीन विहिरी कचरा कुंड्या झाल्या असून त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

झाडे लावा!
झाडे जगवा!!
झाडे तोड रोखा !!!

# अतिवृष्टी नुकसानीचे १५ दिवसांत २० हजार हेक्टरवरील पंचनामे पूर्ण पंधरा दिवसापासून खरीप पाण्यात असूनही सरसकट पंचनामे नाहीच!

वाशी(प्रतिनिधी)-अतिवृष्टीच्या झालेल्या १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीनंतरही कमी अधिक प्रमाणात पाऊस कायम होता. ज्यामुळे संपूर्ण पिके पाण्यात गेली होती. अतिवृष्टीच्या दुसऱ्या दिवशी स्वतः कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी तालुक्यात पाहणी दौरा करून पंचनाम्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर अतिवृष्टी असलेल्या ठिकाणी सरसकट पंचनामे करणार असल्याचे सांगितले होते. मात्र प्रशासनाने पंचनामे हे शेतकऱ्याच्या शेतात जाऊन जियो टॅग फोटोसह करण्यास सुरुवात केली. तालुक्यात ४३ हजार हेक्टरवर खरिपाची पेरणी झालेली असल्याने एवढे पंचनामे कधी होणार? असा प्रश्न शेतकऱ्यांमधून सातत्याने विचारण्यात येत आहे. तरीही अद्यापपर्यंत पंचनामे हे शेतात जाऊनच करण्यात येत असल्याने कृषी अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार १५ दिवसांत २० हजार हेक्टरवरील पंचनामे पूर्ण झालेले आहेत. अशी माहिती गजानन भारती, शेतकरी संघटना यांनी दिली.

सरसकट पंचनामे का गरजेचे? उडीद, मूग ही कमी कालावधीचे आणि सध्या काढणी कालावधी असलेली पिके आहेत. त्यांची पावसामुळे काढणी शक्य नाही. परंतु शेतातून बाहेर काढणे गरजेचे आहे. पंचनामा होण्यापूर्वी काढणी झाल्यास झालेल्या नुकसानीची भरपाई अशक्य आहे. शेतकऱ्याला ई पीक पाहणी बंधनकारक आहे. ज्याद्वारे शेतकरी आपल्या शेतातील पिकांची नोंद करतो. ज्याची माहिती सरकारकडे जमा होते. शेतकऱ्याने केलेली ई पीक पाहणी सरकारकडे आहे. त्यात पिकांची नोंद आहे. सरकार ई-पीक पाहणी शिवाय कोणतीच मदत, विमा देणार नाही म्हणत असताना अतिवृष्टीची मदत देताना पंचनामा ही जाचक अट आहे. सरसकट पंचनामे केल्यास मिळणारी मदतही समान असेल. कारण पंचनामा करणारे कोणत्या मानसिकतेचे आहेत हे सांगता येत नाही. नुकसानीची टक्केवारी ठरवताना ज्याच्या त्याच्या अकलनानुसार नुकसानीची टक्केवारी लागून मिळणाऱ्या मदतीत तफावत येऊन शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही.

शासनाचे डावपेच की प्रशासनाची चालढकल कृषिमंत्र्यांनी वाशी दौऱ्यादरम्यान सरसकट पंचनामे असे सांगितले. त्यावेळी प्रशासनानेही होकारार्थी माना हलवल्या. परंतु नंतर वरिष्ठांचे आदेश आहेत म्हणत पंचनामे करण्यास सुरुवात केली. यामुळे कृषिमंत्र्यांचा दौरा हा पूर्वीच्या कृषिमंत्र्यांमुळे डागाळकेली प्रतिमा सुधारण्यासाठी होता काय? जनतेसमोर सरसकट म्हणून वेळ मारून घ्यायची होती काय? की कृषिमंत्र्यांच्या



आदेशाला प्रशासन महत्त्व देत नाही? की सरकार आणि प्रशासन दोघे शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा करत आहेत, असे अनेक प्रश्न उभा राहिले आहेत. मात्र या सर्वात सर्वसामान्य शेतकरी मात्र भरडला जात आहे. हे मात्र निश्चित आहे.

# बाप्पा, बळीराजाच्या मदतीसाठी सरकारला सुबुद्धी दे!

## आमदार कैलास पाटील यांच्याकडून नुकसान झालेल्या पिकांची पाहणी



धाराशिव(प्रतिनिधी)-जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून अतिवृष्टीमुळे पेरणी झालेल्या क्षेत्रावरील सोयाबीन, उडीद, मूग, तूर ही सर्वच पिके बाधित झाली आहेत. तुळजापूर तालुक्यातील शहापूर निलेगाव गुजनूर, वागदरी, नळदुर्ग, जळकोट, जळकोटवाडी शिवारातील पिकांचे नुकसान झाले आहे. आमदार कैलास पाटील यांनी बुधवारी या गावांमधील शेतकरी, तहसीलदार, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत पीक नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली आणि विघ्नहर्ता गणरायाकडे शेतकऱ्यांना मदत देण्याची सरकारला सुबुद्धी देण्याची प्रार्थना केली.

तुळजापूर तालुक्यात सरासरी २५७ मिमी पावसाची नोंद झाली असून त्यात नळदुर्ग महसूल मंडळात ३१६ मिमी, जळकोट २५२ मिमी पावसाने अतिवृष्टी झाली. शेतात पाणी साचल्याने सोयाबीन, उडीद, मूग, तूर आदी पिकांची वाढ खुंटली आहे. फुलगळ झाली असून उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होणार आहे. सोयाबीन पिकावर मुळकुज, माणकुज आणि शेंगाकरपा आदी रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला आहे. सर्वच पिकांचे ५० टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी तत्काळ अतिवृष्टीचे पंचनामे करा, एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी सरकार व प्रशासनाची असणार आहे. त्यामुळे सरकारला बळीराजाच्या पाठीशी राहण्याची सुबुद्धी बाप्पांनी द्यावी, अशी प्रार्थना पाटील यांनी केली.

# लोहाऱ्यातील मुख्य रस्त्यावर खड्डे, ८०० विद्यार्थ्यांची चिखलातून वाट



लोहारा (प्रतिनिधी)- लोहारा शहर व तालुक्यात बुधवारी रात्री दहाच्या सुमारास जोरदार पाऊस झाला. रात्रभर पावसाने अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचले. रस्त्यावर पाणी साचल्याने व चिखल झाल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाताना कसरत करावी लागली.

मागील दोन तीन दिवसांपासून लोहारा शहर व परिसरात अधून मधून रिमझिम पाऊस होत आहे. त्यात बुधवारी (दि.२७) रात्री दहाच्या सुमारास जोरदार पावसाने सुरुवात केली. त्यानंतर कमी अधिक प्रमाणात रात्रभर पाऊस सुरू होता. गुरुवारी (दि.२८) सकाळपासूनच संततधार पाऊस सुरू झाला. दरम्यान, रात्रभर पावसाने शहरातील अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचते. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून जिल्हा परिषद शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. पाणी जाण्यासाठी दोन्ही बाजूला नाल्या नसल्याने याठिकाणी पाणी थांबून चिखल झाला होता. जिल्हा परिषद शाळेत जवळपास ८०० विद्यार्थी शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांना या चिखलमय व पाण्याच्या रस्त्यानेच शाळा गाठावी लागत आहे. लहान मुलांना शाळेत जाताना होणारा त्रास बघून अनेकांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. पावसाळ्यात ही परिस्थिती नेहमीचीच आहे. या ठिकाणी फक्त मातीमिश्रित मुरूम टाकून तात्पुरत्या स्वरूपात रोडवरील खड्डे बुजवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु या ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करून विद्यार्थ्यांना नेहमी होणाऱ्या या त्रासापासून सुटका करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. या रस्त्यावरून जाणाऱ्या वृद्ध, महिला, नागरिकांना ही या परिस्थितीचा सामना करावा लागतो. बाजाराच्या दिवशी पाऊस झाला की या ठिकाणी मोठ्या प्रमाणात चिखल होतो. त्यामुळे विक्रेते, बाजारकरूंचे हाल होतात. याकडे गांभीर्याने लक्ष देऊन उपाययोजना करणे आवश्यक आहे. या पावसामुळे लोहारा शहरातील अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले. सध्या पावसाळा सुरू आहे. पावसाने अनेक ठिकाणी नेहमी पाणी साचते. तसेच अनेक प्रभागात नालेसफाई न झाल्याने डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. त्यामुळे फवारणीसह अन्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

लातूर समाचार उस्मानाबाद
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६१२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649